स्वस्थ व निरोगी जीवनासाठी मूल मंत्र

१) नाहं कर्ता। हरि:कर्ता । हरि कर्ता हि केवलम्

अर्थ - मी कर्ता नाही. हरि (संसारी दु:ख हरण करणारा) आणि हरिच कर्ता आहे. मानसिक तणाव असलेल्यांनी याचा रोज तीन वेळा जप केला पाहिजे मात्र अर्थ समजून.

जर हरिच कर्ता आहे तर मला कसलीच काळजी, चिंता करण्याची जरूर नाही. मला हरिने, परमेश्वराने बुध्दि दिली आहे. ती नीट वापरून (विवेक ठेवून) मी जीवनात जगले पाहिले.

प्रश्न- तुम्ही या देशात, या गावात, या पालकांच्या पोटी जन्म मागीतला होता काय?

उत्तर - नाही.

प्रश्न- मग तुम्हाला जन्म कोणी दिला? परमेश्वराने जन्म का दिला?

उत्तर- मागच्या जन्माची फळे भोगण्यासाठी (गीतेप्रमाणे) मग प्रारब्धाप्रमाणे जे जे मिळाले आहे. त्याचा श्रेष्ठ वापर करून जीवन जगा. मनुष्य जन्म मिळणे कठीण आहे. म्हणून पशू प्रमाणे जीवन जगता, याच जन्मात आत्म्याची प्राप्ती करून घेऊन मुक्त व्हा. निर्वाण प्राप्त करा.

३) रोज रात्री झोपायचे आधी आत्म परीक्षण करा. १) आज दिवसभरात मी कोणाला शरीराने पीडा दिली. कोणाबद्दल माझे मनात वाईट विचार आले? कोणाला वाणीने कठोर बोललो? दुसरे दिवशी हे आपण अवगुण, (दोष) दूर करण्याचा प्रयत्न करा. ६ महिने रोज अभ्यास करा तर आपले व्यक्तीमत्व पार बदलून जाईल. अनुभव घेवून बघा.

४) दोघांचे, आयुष्यात पूर्णपणे स्वभाव १०% जमू शकत नाही. (विशेषकरून, पुरूष व महिलांचे) कारण प्रत्येकाने मागचे जन्माचा स्वभाव, या जन्मात त्याचेवर झालेले संस्कार (आई, वडिलाकडून, समाजाकडून वगैरे) आणले आहेत. स्वभाव हा तीन गुणांनी, सत्वगुण, रजोगुण व तमोगुण यांनी बनलेला असतो. म्हणून आयुष्यात समझौता करावाच लागेल जर आयुष्य सुखाने व आनंदाने जगायचे असेल तर.

५) 'संतोष' जीवनात संतोष हा फार मोठा गुण आहे.

प्रत्येक गोष्टीत मिळविण्यासाठी प्रयत्न करा. पण जे मिळेल. त्यात समाधान माना. कारण परमेश्वराला आपल्याला काय आवश्यक आहे. ते त्याला माहिती आहे म्हणून जे मिळाले, प्राप्त झाले, त्यात समाधान माना.

उदा. धान्याचा धंदा करणारे दोन व्यापारी, प्रत्येकाने वर्षभर भरपूर श्रम घेऊन धंदा केला. त्यात त्या एकाला नफा झाला व दुसऱ्याला पहिल्याएवढा नफा झाला नाही.

त्यामुळे कमी नफा झालेल्याच्या मनात, फायदा झालेल्या व्यापाऱ्याबद्दल व्देष निर्माण झाला. व्देष हा मोठा शत्रू असून आपली मन:शांती संपवतो. जीवनात मन:शांती व आनंदासाठी आपण प्रयत्न करतो आहोत.

६) दिवसेंदिवस प्रत्येकाचे जीवन स्वार्थी होत चालले आहे. थोडा वेळ तरी आपल्या स्वार्थी वर्तुळातून थोडे बाहेर निघून स्वत:च्या घरच्यांसाठी (आई, वडिल, आजोबा वगैरे) कर्तव्य कर्म केले पाहिजे. तसेच समाजासाठी व राष्ट्रसाठी पण आसक्ती (फळाची) सोडून कर्म करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वामी विवेकानंद सुध्दा आत्मज्ञानाबरोबर कर्म करण्यावर फार जोर देत होते.

७) शरीर व्याधीमुक्त व स्वस्थ निरोगी राहण्यासाठी रोज सुर्य नमस्कार, आसने, प्राणायाम, योगनिद्रा, बिज मंत्र, जप, ओंकार जप व मनासाठी, धारणा, ध्यान यांचा रोज नियमित, यथाशक्ती अभ्यास केला पाहिजे. ब्र. प. पू. जनार्दन स्वामींनी सांगून ठेवले आहे की, समाधानाय सौख्याय निरोगत्वाय जीवने।

योगमेवाभ्यसेत् प्राज्ञ: यथाशक्ती निरंतरम्।

पातंजली मुनींचे यम, नियम, पाळून जर योग्याभ्यास केला तर जीवन बदलून जाईल व जीवनात उत्साह व आनंद याचा अनुभव येईल.

८) आपल्या मनाच्या जुन्या सवयी आपण बदलू शकतो. त्यासाठी फक्त दृढ ईच्छा शक्ती व तीव्र प्रयत्न पाहिजे.

९) आहार सात्विक पाहिजे म्हणजे काय, ज्या आहारामुळे सत्य गुण वाढेल तो आहार, यासाठी अन्न व सर्व ज्ञानेंद्रियांचा (उदा. डोळे, कान, वगैरे) आहार सात्विक पाहिजे.

१०) रोज झोपायचे आधी जर थोडा मंत्रजप, ध्यान, योगनिद्रा केली तर स्वस्थ झोप लागेल. रात्री १० ते सकाळी ५ झोपेचा योग्य वेळ.

मानसिक ताण संपतात. झोपेच्या गोळ्या सुटतात.

नि:शुल्क
पुरूषासाठी वर्ग सकाळी ६ ते ७
महिलासाठी वर्ग रोज सकाळी ७ ते ८
स्थळ: रामार्पण हॉल (दिपार्चन)
राजापेठ चौकाजवळ अमरावती.

● द. ग. सोहोनी
योगप्रेमी
भारतीय योगाभ्यासी मंडळ, अमरावती.
दू. क्र. (०७२१) २५७३५६५

हिवताप पतसंस्थेचे अध्यक्षपदी डी. एस. पवार

अमरावती (प्रतिनिधी): स्वास्थ सेवा हिवताप सेवकांची सहकारी पतसंस्था संचालक मंडळाची निवडणूक अविरोध झाली. नवनियुक्त संचालक मंडळासह सभा झाली. या सभेत सन २०१७-२०२२ या कालावधीकरिता व्यवस्थापक कमिटीची निवडणूक पी. एम. नाखले निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घेतली. अध्यक्षपदासाठी ११ संचालकामधून डी. एस. पवार यांची अध्यक्षपदावर बिनविरोध निवड झाली. उपाध्यक्ष पदासाठी प्रदीप गिरी, सचिव पदासाठी पुरूषोत्तम लुंगे आणि कोषाध्यक्ष पदासाठी सुधाकर चोपकर यांचेही अविरोध निवड झाली. संचालकामध्ये एस. व्ही. जयस्वाल, एन. एस. पाचघरे, प्रकाश दातीर, एस. एस. वाडीकर, जे. बी. माहोरे, मंजुषा देशपांडे, शिल्पा शिर्के उपस्थित होते. निवडणूक अधिकारी यांनी व्यवस्थापक कमिटीची अविरोध निवड झाल्याचे जाहिर केले. निवडणूक अधिकारी पी. एन. नाखले व नवनिर्वाचीत पदाधिकारी मंडळाचे, एस. बी. गौरखेडे, माजी सचिव, गजेंद्र तराळ, ई. एस. गावंडे, नागले, पी. आर. सातपुते, आर. जी. खोलापूरे, श्रीमती पणजकर, आदींनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. तसेच संघटनेचे पदाधिकारी मंडळीने सुध्दा नवनिर्वाचीत पदाधिकारी मंडळाचे अभिनंदन केले.

नेताजी सुभाषचंद्र बोस युनियनचा पल्स पोलीओ कार्यक्रमात सहभाग

अमरावती (प्रतिनिधी): राष्ट्रीय पल्स पोलीओ कार्यक्रम नुकताच पार पडला. त्या अंतर्गत स्काऊट आणि गाईड व रोव्हर कार्यक्षेत्रातील ० ते ५ वर्ष वयोगटातील मुलांना लसीकरण केंद्रावर पोलीओची लस देण्याकरिता प्रवृत्त करण्याकरिता मदत करण्यात आली. शहरी आरोग्य केंद्र संजीवनी रूग्णालय, शाम नगर, अमरावती येथे स्काऊट आणि गाईड व रोव्हर यांचा सहभाग यामध्ये शाळेतून

वंशोदय पब्लीक स्कुल तसेच कस्तुरबा कन्या, होलीक्रॉस मराठी हायस्कुल आणि नेताजी सुभाषचंद्र बोस रोव्हर ओपन युनिट यांच्या सहकार्याने राष्ट्रीय पल्स पोलीओ कार्यक्रम यशस्वी करण्यात आले.

प्रत्येकाच्या घरोघरी जाऊन ० ते ५ वयोगटातील बाळांना पोलीओ पाजण्यास घेवून जावे असे सांगण्यात आले. यामध्ये संजीवनी रूग्णालयाचे कर्मचारी, डॉ. जयश्री नांदूरकर (हरणे), स्त्री वैद्यकीय अधिकारी लुंगे तसेच स्काऊट मास्टर प्रेमदास बागडे, स्वप्नील रोडगे, देवाशिष पंधरे, मिलिंद रंगारी, आशिष वाहने, गाईड कॅप्टन, रमा दायमा आणि रोव्हर मधून राहूल रंगारी, निखील रोडगे, गाईड मधून भूमि रंगारी, मानसी गजभिये, नेहा पाटील, नेहा खाडे, कशिश करताडे हे उपस्थित होते.

स्वामी विवेकानंद वाचनालयाचे उद्घाटन

धामणगाव रेल्वे (वार्ताहर): जीवनात संघर्षातून वाटचाल करणारे समाजात अनेक होतकरू विद्यार्थी आहेत. परंतु व्यवस्थे अभावी शेकडो विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहून जातात. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांकरिता वाचनालयाची निर्मिती व्हावी असे स्वप्न होतेच स्वामी विवेकानंद वाचनालयाचे (बुक बँकेचे) उद्घाटन संघ स्वयंसेवकांच्या प्रयत्नातून व्हावे गौरवास्पद असून स्वप्न पूर्ण होऊन आनंद होत असल्याचे प्रतिपादन रा. स्व. संघाचे प्रांत सहसंचालक चंद्रशेखरजी राठी यांनी येथे व्यक्त केले. श्री राठी सेवा स्मृती भवनच्या दालनात प्रारंभ करण्यात आलेल्या स्वामी विवेकानंद वाचनालयाच्या लोकार्पणासमयी बोलत होते.

या प्रसंगी संघाचे जिल्हा संघचालक ॲड. अरूण जिचकार, तालुका संघचालक गजाननराव पवार, जिल्हा कार्यवाह डॉ. दत्ता रत्नपारखी प्रामुख्याने उपस्थित होते.

स्पर्धा परीक्षांच्या तयारी करीता लागणारी पुस्तकांकरिता किंवा वाचनालयाच्या सदस्यत्वाकरिता नगर सहकार्यवाह विशाल मोकाशे यांच्याकडे संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

डॉ. मुकुंदराव पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण

धामणगाव रेल्वे (वार्ताहर): स्थानिक डॉ. मुकुंदराव के. पवार शैक्षणिक संकुल जुना धामणगाव येथे विदर्भातील पहिले एम. बी. बी. एस डॉक्टर म्हणून ख्याती प्राप्त असणारे, भारत जोडो आंदोलन जनता दलाचे अध्यक्ष, वर्धानगर, परिषदेचे नगराध्यक्ष म्हणून ज्यांनी समाजाची शेवट पेरेंट सेवा करून मरणानंतरही आपला देह समाजाच्या कामात यावा म्हणून ज्यांनी अखंड सेवा केली. शेवटची ईच्छा मुलांसाठी शैक्षणिक संकुल काढून ज्यांनी आपल्याच नंदनवनात विसावा घेतला. या महानमानवाच्या स्मृतीस उजळा म्हणून संकुलात स्व. डॉ. मुकुंदराव उर्फ भैयासाहेब पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण उद्घाटक डायरेक्टर प्रोफेसर ॲड मेडिकल सुप्रिटेंडेट कस्तुरबा हॉस्पिटल व मेडिकल कॉलेज सेवाग्राम वर्धा येथील डॉ. एस. पी कलंत्री यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. श्रीकांत तिडके, प्रमुख पाहुणे आ. पंकज भोयर वर्धा, माजी खासदार विजय मुडे, माजी आ. अरूण अडसड, प्रमुख उपस्थिती नगराध्यक्ष प्रतापदादा अडसड, जि. प. सदस्य वैशाली बोरकर, शिव वैभव संस्थेचे अध्यक्ष किशोर माथकर, सचिव संजायजी वानखडे, उपसरपंच चंद्रशेखर मांडवगडे हे प्रामुख्याने उपस्थित होते. तर संस्थेच्या अध्यक्षा प्रमिला पवार, त्रिमूर्ती पवन प्रतिष्ठांनचे संचालक अध्यक्ष, साहेबराव घाडगे पाटील, सुमती घाडगे, संकुलाचे सचिव शिवाजीराव पवार उपस्थित होते. शिववैभव संस्थेचे पदाधिकारी दादासाहेब आमले, प्रशित साळवे, संजय वानखडे, बाबु दाते, बाळासाहेब इंगोले, किशोर मथांकर, यावेळी उपस्थित होते. पाहुण्यांचे भाषणानंतर पसायदानाने कार्यक्रमाचा शेवट झाला. त्या सोबतच गुरूदेव भोजनालयाचे उद्घाटन धामणगाव नगरीचे नगराध्यक्ष प्रतापदादा अडसड व साहेबराव घाडगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेच्या समन्वयक जया केणे, प्राचार्य डी. डी. राजपूत मुख्याध्यापिका सुषमा जावळे, तर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

प्रगती उच्च प्रा. शाळेत वार्षिकोत्सव संपन्न

अमरावती (प्रतिनिधी): स्थानिक हमालपुरा गांधीनगर येथील प्रगती उच्च प्राथमिक शाळा येथे शाळेचे वार्षिक स्नेह संमेलन पार पडले.

कार्यक्रमाच्या प्रथम दिवशी विविध क्रीडा स्पर्धा यामध्ये बटाटा रेस लिंबू चमचा, लंगडी, अडथळा, सॅक, स्लो सायकल व संगीत खुर्ची यास्पर्धा घेण्यात आल्या.

पालकांकरिता रांगोळी प्रदर्शनी व सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटक सुरेश मेठी स. अध्यक्ष रोटरी क्लब ऑफ अंबानगरी कार्यक्रमाच्या अध्यक्षा संगीता शिंदे संस्थापक अध्यक्षा शिक्षण संघर्ष संघटना प्रमुख अतिथी म्हणून शोभा हरकुट, डॉ. रश्मी नागलकर, जयश्री मोरय्या, अजय मोरय्या, नवीन कामानी, संस्थेचे अध्यक्ष निळकंठराव देशपांडे, उपाध्यक्ष आनंदकुमार डाहाणे, कोषाध्यक्ष आशा देशपांडे, मुख्याध्यापिका सुप्रभा डाहाणे, इ. होते. श्री. विकास दिवे यांनी आजच्या काळात मराठी शिक्षणाची महत्ता यावर मार्गदर्शन केले. सचिन पळसोदकर अध्यक्ष रोटरी क्लब ऑफ इंद्रपुरी अमरावती यांनी शाळेला ई लर्निंग साठी वर्ग १ ते ७ करिता सॉफ्टवेअर प्रदान केले.

विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात आपली कला सादर केली.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता मुख्या. डाहाणे, तवर, तायडे, मोहोड, चिखले, नेहा देशपांडे, अजमिरे, पूजा बनकर, पेंदाम, धानोरकर, सर्व विद्यार्थी व पालकांनी सहकार्य केले.

तुकाराम प्याऊचा शुभारंभ

उन्हाळ्याची चाहुल ११ वर्षाची परंपरा कायम

दर्यापूर(वार्ताहर): येथील दर्यापूर कृ. उ. बा. समिती समोरील बाबासाहेब सांगळूदकर मार्केट समोर दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुध्दा दर्यापूर कृ. उ. बा. समितीचे माजी संचालक अडते व्यापारी प्रभाकर पाटील तराळ यांच्यातर्फे तुकाराम प्याऊ लावण्यात आली. सर्व प्रथम गाडगे महाराज बालगृहाचे संचालक गजानन देशमुख ह्यांचे हस्ते पूजन करून नारळ फोडून पाणपोईचा शुभारंभ झाला. तुकाराम प्याऊचे संचालन प्रभाकर पाटील तराळ यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. गेल्या ११ वर्षापासून दर वर्षी पानपोई उभारून संत गाडगे बाबांच्या तहानलेल्यांना पाणी या संदेशाचे प्रभाकर पाटील तराळ कुटूंब पालन करीत असून तराळ कुटूंबियांचा आदर्श इतरांनी घेण्याचे आवाहन देशमुख यांनी केले. त्या प्रसंगी अमोल गणेशराव तराळ, प्रणव तराळ, गितेश अमोल, प्रमोद इंगळे, डॉ. खंडारे, मेजर शरद अरदळे, मेजर ना राजू नागे, मुकुंद मुळे, अंकुश भारसाकळे, बंडू अडबोल, गजानन तराळ, किशोर गिते, प्रितम नितोने, सौरंभ गावंडे, नितीन नागपूरे, मंगेश खंडारे, मंगेश तराळ, विजय तराळ, गणेश बिजवे, मोहन खुर्दळे, पत्रकार अमोल कंटाळे आदी उपस्थित होते.

डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे केंद्रिय अर्थसंकल्पावर जाहिर व्याख्यान

अमरावती (प्रतिनिधी): समतापर्व प्रतिष्ठान, अमरावती व महाराष्ट्र ऑफिसर्स फोरम, यांचे वतीने दरवर्षी केंद्रीय अर्थसंकल्पावर जाहिर व्याख्यान आयोजित केल्या जाते.

या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात विविध मागासवर्गीय घटकांना, महिलांना, बेरोजगारांना कोणकोणत्या तरतुदी विनिर्दिष्ट केल्या आहेत आणि त्या लोकसंख्येच्या प्रमाणात व पुरेशा आहेत काय? तसेच सद्यस्थितीत देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर कोणकोणती आव्हाने आहेत या विषयी सविस्तर विवेचन जागतिक कितींचे प्रख्यात अर्थतज्ञ, केंद्रीय नियोजन आयोगाचे माजी सदस्य, माजी खासदार, माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ डॉ. भालचंद्र मुणगेकरसाहेब करणार आहेत. सदर कार्यक्रम मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृह अमरावती येथे दि. २३ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वा. आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिरूध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, अध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तथा जिल्हाध्यक्ष, काँग्रेस कमेटी, अमरावती राहणार असून डॉ. प्रविण चव्हाण (आय. एफ. एस.) प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक, संपादक दिलीप येडतकर, माजी परीक्षा नियंत्रक तथा सिनेट सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, डॉ. बी. आर. वाघमारे, अरविंद गावंडे, माजी अध्यक्ष जिल्हा कमर्शियल बँक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, मराठा सेवा संघ आणि राजेंद्र आडे, अध्यक्ष महात्मा फुले अर्बन को- ऑपरेटिव्ह बँक, अमरावती हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे. या अतिशय नाविन्यपूर्ण कार्यक्रमास जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन, समतापर्व प्रतिष्ठानचे मुख्य संयोजक सुधाकर तलवारे, संयोजक रणजीत चव्हाण, सेवानंद वाकोडे, प्रा. अनिल गोटे, भाऊराव वावरे, प्रताप बागडे इ. नी. केले.

बियाणीचा विद्यार्थी राष्ट्रीय युवा महोत्सवात पुरस्कृत

अमरावती (प्रतिनिधी): झारखंड राज्याची राजधानी राँची येथे झालेल्या ३३ व्या राष्ट्रीय युवा महोसवात ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाचा विद्यार्थी सौरभ पातुर्डे याला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवाच्या चमूत 'एकांकीका' या प्रकारात हा विद्यार्थी सहभागी झालेला होता. राष्ट्रीय युवा महोत्सवात विद्यापीठाच्या एकाकीकाच्या चमूला तृतीय पारितोषीक प्राप्त झालेले आहे. या यशाबद्दल ब्रजलाल बियाणी शिक्षा समिती चे अध्यक्ष ॲड. अशोक राठी, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. नामदेवराव बेलसरे, प्रभारी प्राध्यापक

डॉ. नरेंद्र शहारे यांनी सौरभ पातुर्डे याचे अभिनंदन केले या यशाबद्दल त्याचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले. या सर्व उपलब्धी बद्दल या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कुबेराची किल्ली
भाग-२६५

सकारात्मक विचार

'ऋग्वेदकालीन हिंदुस्थान' नावाचा एक ग्रंथ अविनाशचंद्र दास यांनी लिहिलेला आहे. कलकत्ता विश्वविद्यालयाने १९२१ मध्ये तो प्रसिध्द केला. या ग्रंथात त्यांनी असे प्रतिपादन केलेले आहे की हिंदूभूमी हीच आर्यांचे प्राचीन, पुरातन व सतीस्थान होय. प्रा. दास लिहितात की वेदांमध्येच पुरावा सापडतो. हिंदूस्थानातूनच प्राचीन काळात लोकवस्ती युरोप व आशिया या खंडामधील वेगवेगळ्या भागांत स्थायीक झाली आणि तेथे त्या लोकांनी आपल्या आर्यभाषेचा व बोलीचा प्रसार केला. उदाहरणार्थ लिथु आनियन भाषा पुष्कळ अंशाने चटकन ध्यानात येण्यासारखी अशी संस्कृतशी मिळतीजुळती भाषा आहे. कांट या तत्ववेत्याला संस्कृत चा गंधही नव्हता पण लिथु आनियन भाषेचा अभ्यास करताना त्याच्या ध्यानात आले की या भाषेमध्ये तत्वज्ञानामधीलच नव्हे तर इतिहासातल्या पुष्कळशा कूट प्रश्नांची उकल आहे.

भारत देश हा १८ व्या शतकापर्यंत जगातील अत्यंत व सर्वात जास्त समृध्द देश होता. बायबलमध्ये सुध्दा हिंदुस्थानच्या समृध्दीचा उल्लेख आहे. एके ठिकाणी बायबलमध्ये असे लिहिले आहे की, 'तारशीशच्या जहाजामधून सॉलोमन राजाच्या दरबारात सोने, चांदी, हस्तीदंत माकडे व मोर आणले आणि पुष्कळशी चंदनाची झाडे आणि रत्नांची मोठी रास ही ओफीरद्दन आणली. ओफीर म्हणजे मुंबई किनाऱ्याजवळील सोपारा होय. ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकामध्ये ग्रीक राजदूत मेगैस्थेनीस ह्याने हिंदुस्थानातील समृध्दीचे मोठे सविस्तर वर्णन लिहून ठेवले आहे. प्लिनी इ. स. चे पहिले शतकातील असे लिहितो की रोमन लोक दरसाल हिंदुस्थानातून आयात केलेल्या मालावर पाच कोटी डॉलर्स खर्चित, त्यावेळी हिंदुस्थान हे एक मोठे दर्यावर्दी राष्ट्र होते.

चिनी भिक्षू फाह्यान (पाचदेशतक) हा असे सांगतो की हिंदुस्थान हे ज्ञानी लोक व समृध्द संस्कृतीशील आहेत. येथील लोक हे सुखी प्रामाणिक व धनवान आहेत. या संबंधात सॅम्युअल बील यांचे 'बुध्दीस्ट रे कॉर्डस ऑफ दी वेस्टर्न वर्ल्ड' व अशी बरीच पुस्तकामध्ये बघायला मिळेल. चिनी प्रवाशी तर हिंदूस्थानलाच पाश्चीमात्य जग मानायचे.

पोर्तुगीज व इटालीयन व्यापाऱ्यांनी विजयनगरच्या साम्राज्याचे (१३३६-१५६५) त्याच्या वैभवाचे, समृध्दीचे वर्णन लिहून ठेवलेले आहे. ते वैभव पाहून ते प्रवासी अगदी थक्क होवून गेले होते. राजधानीच्या वैभवाचे वर्णन अरब राजदूत रझाक याने करतांना लिहिले आहे की ह्या शहराच्या वैभवाची, ऐश्वर्याची जगातील कोणत्याही शहराशी तुलना होवू शकत नाही.

वरील बाबी विचारात घेता आर्य कोणी परके नव्हते ते येथीलच होते. तसेच त्याकाळी हिंदुस्थानकडे समृध्दी व संपन्नता होती. हिंदुस्थानकडे सोने, चांदी, हिरे, पाचू, कापड, विणकाम, भरतकाम, रेशम, मलमल असे अनेक गृहउद्योग संपन्नतेचे कारण होते. पुढे आपलेच लोक विदेशात जावून वसले. अमेरिका तर एवढ्यातच समृध्द झालेला देश आहे. अमेरिकेला टिपु सुलतानने मदत केलेली आहे. त्यांच्या घटनेत त्यांनी धन्यवाद नमूद केलेला आहे.आपण पिढ्यानपिढ्या, पारंपारिक, उद्योग, शेती व्यवसाय करीत आलो. शंभर वर्षापूर्वीचा काळ बघता खेड्यापाड्यात अनेकांकडे समृध्दी होती. त्यामुळे यंत्र, तंत्राकडे कोणीही वळला नाही. तेच आपल्या प्रगतीला बघून बाकी देशांनी समृध्द व्हावयाचे ठरविले व एक कदम पुढे म्हणजे यंत्र, तंत्र विकसीत केले. आपण आक्रमण, जातीजातीमधील वाद यामध्ये भरकटत गेलो.

या दरम्यान हिंदुस्थानच्या भविष्यासाठी तसेच हिंदुधर्म व ख्रिस्तधर्म यामध्ये एकी असावी या प्रयत्नासाठी हिमालयातील महान आध्यात्मिक गुरू बाबाजी यांनी स्वामी योगानंदाना अमेरिका पाठविले. स्वामी योगानंदानी जगभर योगा प्रसारीत केला. सोबतच बायबल व गीता यामधील साधर्म्य सांगितले. येथू ख्रिस्त हे श्रीकृष्णाचेच अवतार होते हे सुध्दा सिध्द केले. भविष्यात धार्मिक वणवा पेटून अनेक देश भरडले जाणार तेव्हा कदाचित जगामध्ये आपले पाठीराखे ख्रिश्चन राहतील.

आपण आपल्या देशाचे रक्षण तर सोडा पण स्वाभिमान सुध्दा ठेवत नाही. तेंव्हा युगानुयुगे काही आध्यात्मिक आत्मे, दैवीलोक जगाचे नियोजन करताना भारतासाठी काय करता येईल याचा विचार करीत असतात. आजही व पुढे तर भारतच जगासाठी देवभूमी मानला जाणार व खरेच ही देवभूमी आहे, आपण नशीबवान आहोत.

● संजय अलकरी
अमरावती- ९०२८२२७५८०

किसान सभेच्या जिल्हा कार्यशाळेचे आयोजन

अमरावती (प्रतिनिधी): महाराष्ट्र राज्य किसान सभा जिल्हा अमरावतीची 'कार्यशाळा २०१८' शहीद स्मारक चांदूर रेल्वे येथे २४ मार्च रोजी दु. १ वा. संघटनेचे राष्ट्रीय सचिव कॉ. नामदेवराव गावंडे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नवनिर्वाचीत राज्यसचिव कॉ. तुकाराम भस्मे मार्गदर्शन करतील.

शेतकरी आंदोलनाचे क्षेत्र देशभरात विस्तारेल सर्व स्तरातून शेती प्रश्नाला घेवून, सरकारी धोरणाचा विरोध होत आहे. महाराष्ट्रात १ लाख शेतकऱ्यांनी २०० कि. मी. च्या लाँग मार्च काढला. आंदोलनकर्त्यांना आश्वासने द्यायची पण ते सरकारला शक्य नाही असे सांगायचे. अशा स्थितीत पुढील लढ्याची तयारी करण्याकरिता कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

किसान सभेच्या कार्यकर्त्यांना सहभागी होण्याचे जाहिर आवाहने अध्यक्ष डॉ. नामदेव बदरके, सचिव सुनिल मेटकर, राज्यसचिव अशोक सोनारकर, विनोद जोशी यांनी केले आहे.

'महिला हक्क परिषद' २४ मार्चला

चांदूर रेल्वे (वार्ताहर) भारतीय महिला फेडरेशन जिल्हा अमरावती आयोजित महिला हक्क परिषद ढोले कॉम्प्लेक्स, चांदूर रेल्वे येथे २४ मार्चला दु. १ वा. आयोजित आहे. प्रसिध्द शाहीरा शितल साठे, पुणे उद्घाटन करतील. संघटनेच्या राज्य सचिव प्रा.स्मिता गोविंदराव पानसरे परिषदेला मार्गदर्शन करतील.

शेतकऱ्यापाठोपाठ मायक्रो फायनान्स ग्रस्त महिलांच्या आत्महत्या होतील. असे भीषण चित्र ग्रामीण भागात आहे. सरकारी कर व खाजगी नफेखोरी मुळे महागाई आकाशाला भिडली आहे. मुलांकरिता शिक्षण ही जबाबदारी शिक्षणाचे खाजगीकरण करून शासनाने नाकारली आहे. शेतमालाला भाव नाही. ग्रामीण जनजीवन त्रस्त आहे. यामुळे महिलांच्या विवंचना वाढल्या आहेत. पुढील लढ्याची भूमिका ठरविण्याकरिता जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

परिषदेला उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा अध्यक्षा ॲड. क्रांती देशमुख, उपाध्यक्षा ममता सुंदरकर कार्याध्यक्षा प्रतिभा पाळेकर, सचिव सोनाली नवले यांनी केले आहे.

डॉ. जे. एन. खडसे यांना पितृशोक

अमरावती (प्रतिनिधी): स्थानिक श्रीकृष्णपेठ परिसरातील अशोकनगरात राहणारे माजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जे. खडसे यांचे वडील नत्थुजी खडसे यांचे नुकतच दु:खद निधन झाले. ते ८७ वर्षाचे होते. अनेक वर्ष त्यांनी भारतीय सैन्यदलात काम करून देशाची सेवा केली होती. अमरावतीच्या हिंदू स्मशान भूमीत त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ॲड. पी. एस. खडसे यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभेत रामकृष्ण ढोके, राम नितनवरे, प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे व आनंद हिवराळे यांची भाषणे झालीत. त्यांच्या पश्चात त्यांचे पुत्र डॉ. जयप्रकाश, कन्या अनिता व रंजना तसेच फार मोठा आप्त व मित्र परिवार आहे.